N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अमरावती शहर **P.S.(ठाणे):** गाडगे नगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0453 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 11/06/2025 00:53

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिनांक पासून):** 10/06/2025
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 10/06/2025
   **Time From (वेळेपासून):** 14:42 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 14:47 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 11/06/2025 **Time (वेळ):** 00:10 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 004

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 11/06/2025 00:53 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सह दुय्यम निबंधक कार्यालय ,परिसर अमरावती

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** श्री. विकेश गोकुलराव गवाले

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1992

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No. (अ.क्र.)** | **ID Type (ओळखपत्राचा प्रकार)** | **ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)** |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Address Type (पत्याचा प्रकार)** | **Address (पत्ता)** |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | वंदावन अपार्टमेंट, रहाटगाव,अमरावती,अमरावती शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | वंदावन अपार्टमेंट, रहाटगाव,अमरावती,अमरावती शहर,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7709668266

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Name (नाव)** | **Alias (उर्फनाव)** | **Relative's Name (नातेवाईकाचे नाव)** | **Present Address (वर्तमान पत्ता)** |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेवक श्रीमती बेबी कर्णुजी मेश्राम | | | 1. सह दुय्यम निबंधक कार्यालय ,क अमरावती,,गाडगे नगर,अमरावती शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री. किशोर जयरामजी रायबोले | | | 1. सिध्दार्थ नगर सिव्हील लाईन , अमरावती,अमरावती शहर, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

लेखी फिर्याद दिनांक: १०/०६/२०२५ श्री. विकेश गोकुलराव गवाले, वय ३३ वर्ष व्यवसाय खाजगी, रा. वृंदावन अर्पाटमेंट, रहाटगाव अमरावती ता.जि. अमरावती मो.नं.७७०९६६८२६६ मी दिनांक १०/०६/२०२५ रोजी समक्ष ला.प्र.वि. कार्यालय, अमरावती येथे येवुन तकार दिली होती की, मी वर नमुद ठिकाणी राहत असुन मी गेल्या ०६ महिन्यापासुन लक्ष्मीदेवेश इंडीया सिक्युरिटी प्रा.लि. नावाने कंपनी कांतानगर अमरावती येथे सुरू केली आहे. त्यासोबतच माझा प्लॉट खरेदी विकीचा व्यवसाय असून मी मातीचे गणपती विकी करण्याचे सुध्दा काम करतो. मी सन २०२१ मध्ये वृंदावन अपार्टमेंट ३रा माळा वरील टु बि एच के फ्लॅट कं. ३१० रहाटगांव रोड अमरावती अशा वर्णनाचा फ्लॅट मी व माझी पत्नी नामे सौ. आकांक्षा विकेश गवाले यांचे नांवे खरेदी केला होता. सदर फ्लॅटची टॅक्सपावती, विज बिल माझे पत्नीचे नावावर असून सदर अपार्टमेंटच्या बहुतांश फ्लॅटचे ७/१२ हे अजुनही बिल्डरचे नांवे आहे. सदर फ्लॅट घेणेकरिता मी श्रीराम हाउसिंग फायनान्स कडुन गृह कर्ज काढले होते. मला व्यवसायात नुकसान झाल्याने माझे काही ईएमआय मी वेळेत भरु शकलो नाही त्याकरीता मी माझी बहीण सौ. सुनिता भातुरकर यांचेकडून काही महिन्याकरिता हातउसने पैसे घेतले होते. सदर कर्जाची परतफेड करणे मला जड झाले त्यामुळे आम्ही राहत असलेला फ्लॅट विकुन गृहकर्ज व बहिणीचे उसनवारी घेतलेले पैसै परतफेड करण्यासाठी आम्ही सदर फ्लॅट माझी बहीण नामे सुनिता भातुरकर हिला विकण्याचे ठरविले. त्याकरिता अंदाजे ८ दिवसापुर्वी मी सह दुय्यम निबंधक कार्यालय अमरावती येथे गेलो असता मला सह दुय्यम निबंधक कार्यालय क्रमांक २ कार्यालयात रायबोले नावाचे इसम ऑफीस स्टाफमध्ये बसलेले दिसले, त्यांना मी, माझे फ्लॅटचे संबंधीत सर्व कागदपत्रे दाखविले व सदर फ्लॅट मला विक्री करायचा आहे असे सांगितले असता रायबोले यांनी कागदपत्रे पाहुन म्हटले की, सदर फ्लॅटचा ७/१२ तुमच्या नांवे नसल्यामुळे सदर फ्लॅटची विक्री होवु शकणार नाही, तरी सदर फ्लॅटची विक्री करून घ्यायची असेल तर मी सह दुय्यम निबंधक श्रीमती बेबी मेश्राम मॅडम यांना भेटुन तुमचे काम करून देवु शकतो, त्याकरिता तुम्हाला ५,०००/- रू. दयावेच लागतील. मी नाईलाजाने त्याना हो असे म्हणुन तेथुन निघुन आलो.आज दिनांक १०/०६/२०२५ रोजी मी माझे फ्लॅट विकी करण्याचे सर्व कागदपत्रे तयार करून सह दुय्यम निबंधक क्रमांक २ कार्यालय अमरावती येथे गेलो असता मला तेथे श्री. रायबोले भेटले व त्यांनी मला सदर फ्लॅट ची विकीखत करून देण्यासाठी ५,०००/- रू. ची मागणी केली व म्हटले की, मी सह दुय्यम निबंधक श्रीमती बेबी मेश्राम मॅडम यांना भेटुन तुमचे काम करून देवु शकतो तेव्हा मी त्यांना म्हटले की, आधी तुम्ही माझी विकीखत करुन दया असे म्हटले असता ते सह दुय्यम निबंधक श्रीमती बेबी मेश्राम यांना भेटले व त्यानंतर माझे फ्लॅटची विक्रीची पुर्ण प्रकीया सह निबंधक कार्यालय कमांक २ येथे करुन घेतली त्यानंतर श्री. रायबोले यांनी मला म्हटले की, आपले ठरल्याप्रमाणे झालेल्या कामाचे ५०००/- रु सह दुय्यम निबंधक श्रीमती बेबी मेश्राम यांना दिल्याशिवाय तुझे काम होणार नाही व तुझे खरेदीची मुळ प्रत मिळणार नाही असे म्हटले असता मी नाईलाजास्तव त्यांना हो म्हणुन तेथुन निघुन आलो. मला सह दुय्यम निबंधक श्रीमती बेबी मेश्राम व इसम नामे रायबोले यांना लाच म्हणुन पैसे देण्याची मुळीच ईच्छा नाही तसेच त्यांच्यासोबत माझा कोणताही देवाण घेवाण चा आर्थीक व्यवहार नाही. तसेच त्यांच्यासोबत कोणत्याही प्रकारचा वाद नाही. तरी त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी ही विनंती. आहे अशा आशयाची तकार मी दिली होती.मी दिलेल्या तकारीवर कार्यवाही करण्याकरीता पो.नि. चित्रा मेसरे यांनी शासकीय तंत्र निकेतन अमरावती येथून दोन सरकारी पंच यांना पत्र देवुन त्यांचे कार्यालयात बोलावले आणि माझा त्यांचा परिचय करुन दिला. तसेच दोन्ही पंचास व मला डिजिटल व्हाईस रेकॉर्डर बद्दल माहीती सांगुन त्याची कार्यपध्दती सांगितली, सुचना दिल्या व प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्या संदर्भान सविस्तर पडताळणी पुर्व पंचनाम्याची कार्यवाही करण्यात

आली.त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझेजवळ दिले व मी, पंच क. १ श्री. चारोळे यांचेसोबत श्री. रायबोले यांची भेट घेण्याकरीता सह दुय्यम निबंधक कार्यालय क.२, अमरावती येथे रवाना झालो. त्याठिकाणी आमची भेट श्री. रायबोले यांचे सोबत झाली. भेटी दरम्यान श्री. रायबोले यांनी मला म्हटले की, फ्लॅटचा ७/१२ तुमच्या नांवे नसल्यामुळे सदर फ्लॅटची विक्री होवु शकणार नाही, तरी सदर फ्लॅटची विकी करून घ्यायची असेल तर मी सह दुय्यम निबंधक श्रीमती बेबी मेश्राम मॅडम यांना भेटुन तुमचे काम करून देतो असे म्हटले. तसेच श्री. रायबोले यांनी मला पडताळणी कार्यवाही दरम्यान पंच क.१ यांचेसमक्ष ५,०००/- रू. लाचेची मागणी केली व मी तुला तुझी मुळ खरेदी मॅडम कडून आणून देतो, तु ५०००/- रू घेवून ये असे म्हणून माझेकडुन ५,०००/- रु स्विकारन्याचे मान्य केले. तसेच पडताळणी कार्यवाही दरम्यान श्री. रायबोले यांनी सह दुय्यम निबंधक श्रीमती बेबी मेश्राम यांची भेट करुन दिली असता तकारदार यांनी श्रीमती मेश्राम यांना म्हटले की, श्री. रायबोले हे 'पाच हजार रुपये म्हणून राहीले मॅडम' त्यावेळी श्रीमती मेश्राम यांनी रायबोले यांना उद्देशून म्हटले की, यांचे काय आहे ते, तुम्ही पाहून घ्या व निपटून घ्या' असे बोलून लोकसेवक श्रीमती मेश्राम यांनी श्री. रायबोले यांना लाच स्विकारण्यास प्रोत्साहन दिल्याचे पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले.त्यानंतर लागलीच सर्वानुमते सापळा कार्यवाही आयोजीत करण्याचे ठरवण्यात आले. त्याकरीता पोनि मेसरे मॅडम यांनी मला श्री. रायबोले यांना देण्यासाठी लाच रक्कम ५,०००/- रू. हजर करण्यासाठी सांगितलेवरून मी माझेजवळील ५,०००/- रू. रक्कम ज्यात ५००/- रू. दराच्या एकुण १० नोटा हजर केल्या. त्यानंतर त्या नोटांना ॲन्थ्रॉसीन पावडर लावण्याची कार्यवाही करण्यात आली व मला आणि दोन्ही पंचाना सुचना देण्यात आल्या. त्याबाबतचा सविस्तर सापळापुर्व पंचनामा केला.त्यानंतर मला व पंच क. १ श्री. चारोळे याना माझेजवळ व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून मी श्री. रायबोले यांची भेट घेण्याकरीता सह दुय्यम निबंधक कार्यालय क.२, अमरावती येथे १४.४२ वा. रवाना केले. आमच्या पाठोपाठ संपूर्ण सापळा पथक, पंच क. २ श्री.वर्षे यांचेसह खाजगी वाहनाने व सरकारी वाहनाने सह दुय्यम निबंधक कार्यालय क.२, अमरावती येथील परिसरात पोहचुन आजुबाजुला आडोसा घेवून थांबले. त्यानंतर मी व पंच क. १ श्री. चारोळे असे श्री. रायबोले यांना भेटण्याकरीता गेलो असता मला श्री. रायबोले हे कार्यालया बाहेर उभे असल्याचे दिसले. त्यानंतर मी व पंच क. १ श्री. चारोळे असे दोघेही श्री. रायबोले यांना भेटलो. मी श्री. रायबोले यांच्याशी माझे कामासंबंधाने चर्चा केली व त्यांनी मला माझी मुळ फ्लॅटची खरेदीची प्रत दिली. तेव्हा रायबोले यांनी पुर्वी सांगीतल्याप्रमाणे मी माझे जवळील लाच रक्कम ५,०००/- रू. श्री. रायबोले यांच्या हातात दिले, सदरची रक्कम श्री. रायबोले यांनी स्विकारून माझे व पंच क. १ श्री. चारोळे यांचे समोरच त्यांचे नेसते शर्टचे डावे खिशात ठेवले. त्यांनतर मी तेथुनच सापळा पथकास लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजित इशारा केला. त्यांनतर लागलीच पोनि दंदे दंदे साहेब, व सापळा पथक त्याठिकाणी आले, माझे जवळील व्हॉईस रेकॉर्डर बंद केला, ती वेळ १४.४७ वा. होती. त्यांनतर पोनि दंदे साहेब यांनी श्री. रायबोले यांना स्वतःचे ओळखपत्र दाखवले व परिचय दिला. त्यांनतर श्री. रायबोले यांना ताब्यात घेवून त्यांना त्यांचे नाव व पद विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री. किशोर जयरामजी रायबोले, वय ४९ वर्ष, व्यवसाय खाजगीरित्या खरेदी विकीची कामे करणे, रा. सिध्दार्थ नगर, अमरावती असे सांगितले. त्यांनतर श्री. रायबोले यांना पंचासमक्ष लाच रक्कमेबाबत विचारले असता त्यांनी सदरची लाच रक्कम ही त्यांचे शर्टचे डावे खिशात असल्याचे सांगितले. त्यानंतर तेथे लोकांची खुप गर्दी असल्याने पोनि दंदे साहेब यांनी श्री. रायबोले यांना ला.प्र.वि. कार्यालयात घेवून गेले. त्यानंतर पोनि मेसरे मॅडम यांनी मपोकों चित्रलेखा वानखडे यांचेसह सह दुयम निबंधक कार्यालय क. २ अमरावती येथे जावून श्रीमती बेबी मेश्राम यांना स्वतःचे ओळखपत्र दाखवुन परिचय दिला. त्यांनतर श्रीमती बेबी मेश्राम यांना ताब्यात घेवून त्यांना त्यांचे नाव व पद विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्रीमती बेबी कर्णजी मेश्राम, वय ५७ वर्ष, पद सह दुय्यम निबंधक नेमणुक सह दुय्यम निबंधक कार्यालय क.२ अमरावती, असे सांगितले. त्यानंतर त्यांना ला.प्र.वि. कार्यालयात घेवून गेले. त्यानंतर पोनि मेसरे मॅडम यांचे सुचनेवरून पंच क. १ श्री. चारोळे यांनी लाच रक्कम श्री. रायबोले यांचे शर्टचे डावे खिशातुन बाहेर काढली. सदर लाच रक्कम तक्रारदार यांनी सापळापूर्व कार्यवाहीमध्ये सादर केलेली असल्याबाबत पंचानी खात्री केल्यानंतर नमुद ५,०००/- रू. लाच रक्कम पोनि मेसरे मॅडम यांच्याकडे सुरक्षित ठेवली. त्यांनतर पोनि मेसरे मॅडम यांनी सह दुय्यम निबंधक श्रीमती बेबी मेश्राम यांना १५.०० वा. चे सुमारास सदर प्रकरणाचे तपासकामी ताब्यात घेवून त्याबाबत त्यांचे वरिष्ठांना कारवाई बाबतची माहिती दिली. तरी दिनाक १०/०६/२०२५ रोजी १४.४२ ते १४.४७ वा.चे दरम्यान सह दुय्यम निबंधक कार्यालय क.२ अमरावती येथे खाजगी इसम श्री. किशोर जयरामजी रायबोले, वय ४९ वर्ष, व्यवसाय खाजगीरित्या खरेदी विक्रीची कामे करणे, रा.सिध्दार्थ नगर, अमरावती यांनी तक्रारदार यांचे फ्लॅटचा ७/१२ तुमच्या नांवे नसल्यामुळे सदर फ्लॅटची विकी होवु शकणार नाही, तरी सदर फ्लॅटची विकी करून घ्यायची असेल तर मी सह दुय्यम निबंधक श्रीमती बेबी मेश्राम मॅडम यांना भेटुन तुमचे काम करून देतो असे म्हणुन श्री. रायबोले यांनी मला पडताळणी कार्यवाही दरम्यान पंचासमक्ष ५,०००/- रू. लाचेची मागणी केली व मी तुला तुझी मुळ खरेदी मॅडम कडून आणून

देतो तु ५०००/-रू घेवून ये असे म्हणून माझेकडुन ५,०००/- रू स्विकारल्याचे ही मान्य केले. तसेच सापळा कारवाई दरम्यान लाचेची रक्कम स्वतः स्विकारली. तसेच लोकसेवक श्रीमती बेबी कर्णुजी मेश्राम, वय ५७ वर्ष, पद सह दुय्यम निबंधक नेमणुक सह दुय्यम निबंधक कार्यालय क.२ अमरावती यांनी खाजगी इसम श्री. किशोर जयरामजी रायबोले यांना त्यांचे शासकीय कार्यालयात प्रवेश देवून शासकीय दस्तऐवज हाताळण्याची मुभा दिली तसेच श्री. रायबोले यांना माझे खरेदी खताची मुळ प्रत ताब्यात देवून मला देण्यास सांगुन लाच रक्कम स्विकारण्यास प्रोत्साहन दिले. तरी माझे तकारी वरुन सह दुय्यम निबंधक श्रीमती बेबी कर्णजी मेश्राम व खाजगी इसम श्री. किशोर जयरामजी रायबोले यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, ही विनंती. अश्या लेखी फिर्याद वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

DINESH SUKHDEVRAO DAHATONDE(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): DINESH SUKHDEVRA

Rank(पद): I (Inspector)

No.(सं.):